# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २२/०९/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### खून

**पो.स्टे. कळमेश्वर :–** अंतर्गत १२ कि. मी अंतरावर मौजा १४ मैल मयत भाडयाने राहत असलेल्या खोलीमध्ये दिनांक २१/०९/२०२२ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादीचा मोठा भाउ आझाद जमशेद शेख(मृतक) वय २५ वर्ष रा. वडचिचोली त पांढूर्णा मध्यप्रदेश, ह.मु १४ मैल हा सचिन माकोडे याच्याकडे चिकन ॲन्ड मटन सेंटर येथे मागील २ वर्षापासून काम करीत होता. दुकान असलेल्या जागेत सचिन माकोडे याची मालकीची जागा होती. त्याने मृतकला वरील खोली भाडयाने दिली होती. त्याखालीच्या शेजारी राहणारी आरोपी क्र. १. सुनिता जैस्वाल वय ३० वर्ष रा. उमरी त.रिवा मध्यप्रदेश ह.मु १४ मैल, सचिन माकोडे याच्या घरी भाडयाने ही तिच्या परीवारासह किरायने रहायला आली. आरोपी क्र. १ हिच्या सोबत मृतकाचे प्रेमसंबंध होते. तसेच आरोपी क्र. १ हिचे आरोपी क्र. २. दिलीप काशीराम पटले, वय २८ वर्ष, रा. सोनबा नगर, खडगाव रोड लावा वाडी, नागपूर याच्या सोबत सुध्दा प्रेम संबंध होते. हि बाब मृतक यास समझल्याने त्याने तिला आरोपी क्र. २ याच्या सोबत भेटण्यास मनाई केली. त्यामुळे ती मानन्याचे स्थितीत नव्हती या कारणावरून सुनिता व आझाद त्यांच्यात नेहमी भांडण होत होते. या कारणावरून आरोपीतांनी संगणमत करून आझाद शेख यास नॉयलन दोरीच्या साहाय्याने गळा आवळुन त्याला जिविनाशी ठार मारले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आफताब जमशेद शेख, वय २० वर्ष, रा. वडचिचोली त. पांढूर्णा जि. छिंदवाडा(मध्यप्रदेश) यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री शेख हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर